# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

केगाव, सोलापूर - 413 255, महाराष्ट्र (भारत)

दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७०/७१/७२/७३/७४ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,

संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac.in ई-मेल: affiliation@sus.ac.in विस्तारित क्र.: १२२




## शैक्षणिक, संशोधन व विकास (संलग्नता विभाग)

### अत्यंत महत्वाचे/तातडीचे परिपत्रक

**विषय :-** **महाविद्यालयांचे मूल्यांकन (Accreditation) व पुनर्मूल्यांकन (Re-accreditation) करण्याबाबत.**

**वाचा :-** १) शासन निर्णय क्र. २०१०/(२०/१०)/विशि-३, दिनांक ०८/१०/२०१०.

२) या कार्यालयाचे पत्र क्र. SOL/BCUD/AFFI/६६६/५६०३, दिनांक १४/१०/२०१०.

३) या कार्यालयाचे पत्र क्र. SOL/BCUD/AFFI/८५५/६६८८, दिनांक ११/११/२०१०.

४) या कार्यालयाचे पत्र क्र. SUS/VC/१७३, दिनांक २०/११/२०१३.

५) या कार्यालयाचे पत्र क्र. सोविसो/मविविमं/संलग्नता/१८४४, दिनांक १९/०५/२०१४.

६) या कार्यालयाचे पत्र क्र. सोविसो/मविविमं/संलग्नता/३७८४, दिनांक २१/०७/२०१५.

७) या कार्यालयाचे पत्र क्र. सोविसो/मविविमं/संलग्नता/३५२२, दिनांक ०६/०४/२०१६.

८) या कार्यालयाचे पत्र क्र. सोविसो/मविविमं/संलग्नता/७८६९, दिनांक १६/०८/२०१६.

९) या कार्यालयाचे पत्र क्र. पुअहोसोविसो/संलग्नता/२०१९/८२१५, दिनांक २५/१०/२०१९.

१०) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. अ.शा.क्र. के आर ए-२०२२/प्र.क्र.-१९६/वि, दिनांक १९/०७/२०२२.

११) मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्र. एनजीसी/२०२२/नॅक/ अशा.अनु.म.वि./औवि/मवि-३/१०१००, दिनांक २७/०७/२०२२.

१२) मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर यांच्या पत्र क्र. विससं/उशि/सोविसो/२०२२/१५२८, दिनांक ०३/०८/२०२२.

संदर्भ क्र. २ व ३ अन्वये ज्या महाविद्यालयांनी मूल्यांकन (Accreditation) व पुनर्मूल्यांकन (Re-accreditation) करुन घेतलेले नाही अशा महाविद्यालयांनी संदर्भीय शासन निर्णयानुसार तात्काळ कार्यवाही करावी, जी महाविद्यालये नॅक संदर्भात शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करणार नाहीत त्यांचे विरुध्द असंलग्निकरणाची कार्यवाही करण्यात येईल, असे कळविले होते. तर संदर्भ क्र. ४ अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी देखील NAAC/NBA त्वरित करुन घेण्याबाबत आपणास सूचित केले होते. तद्नंतर संदर्भ क्र. ५ ते ९ अन्वये सर्व संलग्नित महाविद्यालयांना नॅक मूल्यांकन/पुनर्मूल्यांकन करुन घेणेबाबत वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे. तसेच ज्या महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकन/पुनर्मूल्यांकन केलेले नाही, अशा महाविद्यालयास यापूर्वी नॅक मूल्यांकन / पुनर्मूल्यांकन करुन घेणेबाबत महाविद्यालयनिहाय स्वतंत्ररित्या कळविण्यात आलेले आहे.

सदर प्रकरणी मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी संदर्भ क्र. १० वरील पत्रासोबतच्या विवरणपत्रान्वये नॅक मान्यताप्राप्त नसलेल्या संस्थांसाठी नॅक मिळण्यासाठीचे वार्षिक लक्ष्य निश्चित करणेबाबत निर्देशित केले आहेत. तर संदर्भ क्र. ११ अन्वये मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांनी विद्यापीठ परिक्षेत्रातील महाविद्यालयाचे नॅक यापुढील Cycle नुसार पुनर्मूल्यांकन व मानांकन करुन घेण्याच्या दृष्टीने सदरील महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचालक प्रतिनिधी, IQAC समन्वयक यांची विद्यापीठस्तरीय कार्यशाळा / बैठक आयोजित करण्याबाबत व संबंधित महाविद्यालयांना नॅक मूल्यांकन / मानांकन करुन घेणेबाबत विद्यापीठ स्तरावरुन कळविण्याबाबत निर्देशित केले आहे. सदरचे निर्देश संदर्भ क्र. १२ अन्वये मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर यांचेमार्फत प्राप्त झाले आहे.

(P.T.O.)

संदर्भ क्र. १०, ११ व १२ अन्वये सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य / प्राचार्या यांना सूचित करण्यात येते की, शासनाच्या धोरणानुसार नॅक यापुढील Cycle नुसार पुनर्मूल्यांकन व मानांकन करुन घेण्याच्या दृष्टीने योग्य ती कार्यवाही तातडीने करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सोबत जोडलेल्या प्रपत्र अ मध्ये दिनांक ०१/०९/२०२२ पर्यंत सादर करावा. अन्यथा आपल्या महाविद्यालयाचा अहवाल निरंक समजून नियमानुसार पुढील कारवाई करण्यात येईल.

**तसेच ज्या महाविद्यालयांची नॅक मूल्यांकन अथवा पुनर्मूल्यांकनाची कार्यवाही सुरु आहे अशा महाविद्यालयांनी कार्यवाही सुरु आहे असे मोघम उत्तर न देता नेमकी सद्यस्थितीत व काय कार्यवाही सुरु आहे याचा स्पष्ट उल्लेख करावा. तसेच सोबत जोडलेल्या प्रपत्र अ सोबत त्याच्या पुराव्याच्या पृष्ठ्यर्थ आवश्यक ते कागदपत्रे जोडावीत.**

संदर्भ क्र. ११ व १२ च्या अनुरोधाने महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचालक प्रतिनिधी व IQAC समन्वयक यांची विद्यापीठस्तरीय कार्यशाळा / बैठक आयोजनासंदर्भातील माहिती आपणास अलहिदा कळविण्यात येईल.

आदेशावरुन/-

**(डॉ. सु. कि. पवार)**
**प्र. कुलसचिव**

जा. क्र. : पुअहोसोविसो/संलग्नता/नॅक परिपत्रक/२०२२-२३/6297
दिनांक : 18 AUG 2022

सोबत : प्रपत्र अ

प्रति,
**मा. प्राचार्य / प्राचार्या,**
सर्व संलग्नित महाविद्यालये,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

**प्रत :** १) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, पुणे.
३) मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर, संलग्नता विभाग यांच्या

## दिनांक १८/०८/२०२२ रोजीच्या परिपत्रकासोबतचे 'प्रपत्र अ'

## नॅक मूल्यांकन / पुनर्मूल्यांकन / एम.बी.ए. मानांकन / एम.बी.ए. पुनर्मानांकन याबाबत सद्यस्थितीचा अहवाल

**दिनांक: ३१/०७/२०२२ अखेर**

| अ.क्र | महाविद्यालयाचे नाव | महाविद्यालय सुरु झालेले वर्ष | महाविद्यालय मूल्यांकनास पात्र आहे किंवा नाही | महाविद्यालयाचे मूल्यांकन झाल्याचे वर्ष (प्रमाणपत्रावरील तारीख नमूद करावी) | महाविद्यालयाला मूल्यांकनाचा मिळालेला दर्जा (सोबत प्रमाणपत्राच्या दोन छायांकित प्रती साक्षांकित करून जोडव्यात.) | महाविद्यालयाचे मूल्यांकन झाले नसल्याचे कारण व सद्यस्थिती | महाविद्यालय पुनर्मूल्यांकनास पात्र आहे किंवा नाही | महाविद्यालयाचे पुनर्मूल्यांकन केल्याचे वर्ष (प्रमाणपत्रावरील तारीख नमूद करावी) | महाविद्यालयाला पुनर्मूल्यांकनामध्ये मिळालेला दर्जा (सोबत प्रमाणपत्राच्या दोन छायांकित प्रती साक्षांकित करून जोडव्यात.) | मुल्यांकन व पुनर्मूल्यांकना बाबत केलेल्या कार्यवाहीची सध्यस्थिती | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| | | | | | | | | | | | |

प्राचार्य
महाविद्यालयाचे नाव
सही व शिक्का

टिप: ज्या महाविद्यालयांचे नॅक तृतीय मूल्यांकन झालेले आहे अशा महाविद्यालयांनी स्तंभ क्र. ८ ते ११ मध्ये पुनर्मूल्यांकनाव्यतीरिक्त अधिकची माहिती सादर करावी.